## रे.मुनं.३६/२०१५ नि.क्र.१ वरील आदेश

## शकुंतला तरे वि अवधुत गोसावी

१. प्रस्तूत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी नि.४६ कडे न्यायालयाचे अधिकार क्षेत्राबाबत प्राथमिक मुद्दा काढणेकरीता अर्ज दाखल केला होता. प्रस्तूतचा दावा या न्यायालयास चालवण्याचा अधिकार आहे का असा प्राथमिक मुद्दा दि.२६.१०.१६ रोजी काढण्यात आला. प्रस्तूत अर्जावरती आदेश होउन निशाणी ४६ मंजूर करण्यात आला आणि प्रस्तूत दाव्यामध्ये खालील प्राथमिक मुद्दा काढण्यात आला.

| **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. प्रस्तूत दावा या न्यायालयाच्या अधिकार कक्षेत आहे का ? | होय |
| २. काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

### कारणमिमांसा

२. **मुद्दा क्र.१ करीता :-**

प्रस्तूत प्राथमिक मुद्यावरती वादी व प्रतिवादी यांचा पुरावा घेण्यात आला. प्राथमिक मुद्यावरील पुराव्यामध्ये नि.५९ कडे प्रतिवादी अवधुत जयराम गोसावी यांनी पुरावा दिलेला आहे. उलटतपासामध्ये प्रतिवादी कथन करतात की, दावा मिळकती कुठल्या आहेत माहित नाही. दावा मिळकती मुळ पुरुष मल्हारी सखाराम गोसावी यांच्या खरेदी मालकीच्या आहेत तसा फेरफार क्र.६२२ आहे. मल्हारी मयत झाल्यानंतर दावा मिळकतीचे वारस वादी आणि प्रतिवादी आहेत. वादपत्रामध्ये दिलेली वंशावळ मान्य असल्याचे प्रतिवादी कथन करतात. मल्हारी यांना आत्माराम व शांताराम ही दोन मुले होती. ज्ञानेश्वर शांताराम यांचे

वारस आहेत. फेरफार क्र.२२९४ आणि २५७८ अन्वये आत्माराम आणि ज्ञानेश्वर यांच्यामध्ये वाटप झाल्याबाबत माहित नसल्याचे प्रतिवादी उलटतपासामध्ये कथन करतात. दावा मिळकतीचे ७/१२ सदरी अथवा फेरफार सदरी देवस्थान विश्वस्त अशी नोंद झालेली नाही असे प्रतिवादी कथन करतात. नि.६१ कडे दाखल असलेली विश्वस्त व्यवस्था नोंदणी वडील जयराम यांनी केली होती. दावा मिळकती वडील जयराम यांच्या स्वकष्टार्जित मिळकती नसल्याचे तसेच दावा मिळकती मल्हारी यांच्या असल्याचे प्रतिवादी कथन करतात. दावा मिळकत देवस्थानमध्ये नोंद करण्यापूर्वी सहहिस्सेदारांची संमती घेतली होती किंवा कसे माहित नसल्याचे प्रतिवादीने उलटतपासामध्ये कथन केले आहे.

३. प्रतिवादींतर्फे नि.६० कडे गट नं.१२७ आणि गट नं.१३८ एकत्रीकरणाचा उतारा दाखल केला आहे. निशाणी ६१ कडे मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था मजगाव खारदोडकुले यांचे मल्हारी दत्त देवस्थान मजगाव नोंदणी पुस्तक अनुसुची-१ दाखल केली आहे. प्रतिवादीतर्फे नि.६३ कडे पुरावा बंद पुरशीस दाखल केली आहे. नि.६४ कडे वादीतर्फे पुरावा बंद पुरशिस दाखल केली आहे. नि.५४ कडे वादीने म्हणणे दाखल केलेले आहे. वादी कथन करतात की, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे वडील जयराम यांनी दि.२५.४.८८ रोजी नोंदणी केल्याचे दिसून येते. सदर नोंदणीपूर्वी सह कब्जेदारांची संमती घेतलेली नाही. सदर नोंदणी केली त्यावेळी इतर वारस म्हणून सहहिस्सेदारांची संमती घेणे आवश्यक होते. विश्वस्ताची नोंद दावा मिळकती सदरी किंवा गटस्कीम सदरी कुठेही दाखल नाही. सदर विश्वस्त नोंदणीचा अंमल दिला गेला याबाबतची माहिती नमुद नाही. ७/१२ सदरी दावा मिळकती या विश्वस्त संस्थेच्या मालकीच्या आहेत याच्या कुठल्याही फेरफार नोंदी दाखल नाहीत. दावा मिळत विश्वस्त संस्थेची मालमत्ता आहे असे प्रतिवादीचे कथन खोटे आहे.

४. प्रस्तूत प्राथमिक मुद्यावर वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.तांबडकर आणि प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.सावंत यांचा युक्तीवाद ऐकला अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तूत दाव्यामध्ये दावा मिळकती देवस्थानच्या असल्याने प्रस्तूत दावा चालवण्याचा अधिकार या न्यायालयास नाही असे प्रतिवादीने कथन केले आहे. सदर बाबत प्रतिवादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तूत दाव्यामध्ये खारदोडकुले येथील गट नं.१२७ व गट नं ३८ या मिळकती देवस्थानच्या असल्याबाबत प्रतिवादीने कथन केले आहे. प्रतिवादीने दाखल केलेले मल्हारी दत्त देवस्थान मजगाव विश्वस्त व्यवस्था अन्वये नोंद असल्याचे अनुसूची-१ दाखल केलेली आहे. नि.६१ कडे दाखल असलेले सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांचे नोंदणी पुस्तक अनुसूची-१ याचे अवलोकन केले असता विश्वस्तांची नावे या सदरी आत्माराम मल्हारी गोसावी व ज्ञानदेव शांताराम गोसावी यांची नावे दिसत आहेत. नोंदणी दि.२५.४.८८ रोजीची आहे. देवळाची इमारत व सभोवतालची जागा ५.५०(साडेपाच) गुंठे असे नमुद आहे. सदर नोंदणी १९८८ ची आहे. वादीतर्फे गट नं.१२७ व १३८ चे ७/१२ उतारे, गट नं. ६१३/३ चा ७/१२ उतारा, फेरफार नोंद क्र.६२२, २५७८, २२९४, १४३ आणि २२१ दाखल केलेले आहेत. तसेच नोटीस यांच्या स्थळप्रती दाखल केलेल्या आहेत. गट नं.१२७ आणि गट नं.१३८ यावरील नोंदी २००३-२००४ पासून २०१४-१५ पर्यंतच्या आहेत. सदर दोन्ही गटांच्या ७/१२ उता-यांवर वादी व प्रतिवादी यांच्या नावांच्या नोंदी सहहिस्सेदार म्हणून आहेत. सदर दाखल कागदपत्रांवरुन गट नं.१२७ व १३८ यावर वारस नोंदी झाल्याचे दिसत आहे. दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. दावा मिळकतीवर १९८८ पासून ते आजतागायत देवस्थानची नोंद असल्याबाबतचे फेरफार उतारे ७/१२ उतारे दाखल नाहीत. नि.६१ कडे दाखल असलेल्या उता-यानंतर त्याप्रमाणे मिळकतीस पूढे देवस्थानचा अंमल दिल्याबाबतच्या महसूली नोंदी अथवा ट्रस्टचे नाव याबाबतची नोंद असलेले फेरफार उतारे, ट्रस्ट सद्यस्थितीमध्ये चालू

असल्याबाबत विश्वस्त मंडळ ठराव अथवा नोंद देवस्थान छायाचित्रे असा कोणताही पुरावा सद्यस्थितीमध्ये दाखल नाही. सबब दावा मिळकतीला देवस्थानच्या असल्यामुळे या न्यायालयास प्रस्तूत दावा चालवण्याचा अधिकार नाही असा प्राथमिक मुद्दा प्रतिवादीने सिध्द केलेला नाही.

५. प्रस्तूत दावा गुणदोषांवर पुराव्याच्या आधारे अंतिमत: ठरणार आहे. सदर वेळी प्रतिवादीस पुरावा दाखल करण्याची पूर्ण संधी आहे. तथापी दाव्याच्या प्राथमिक स्थितीमध्ये दावा मिळकती या देवस्थानच्या आहेत असे प्रतिवादी सिध्द करत नाहीत. सदरबाबतचे कागदपत्र दाखल करण्यास प्रतिवादींना पुरेशी संधी देण्यात आली आहे. दाव्याच्या संपरिक्षेमध्ये प्रतिवादीने दावा मिळकती या देवस्थानच्या असल्याबाबत पुरावा देण्यास संधी आहे. सबब मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत :-</u>**

६. मुद्दा क्र.१ च्या होकारार्थी निष्कर्षावरुन मी खालील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तूत दावा रे.दि.मु.नं.३६/१५ चालविणेचा पूर्ण अधिकार या न्यायालयास आहे. दावा या न्यायालयाचे अधिकारकक्षेत येतो असा आदेश पारीत करणेत येतो.

२. वादी व प्रतिवादी यांनी दावा गुणदोषांवर चालवण्याचा आहे.

मुरुड,
दिनांक : २२.१२.२०१७

(एम.ए.आदुके)
दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,मुरुड